पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ६४ /२०२४ दि. ०५ /०४/२०२४

## वाहतूक नियंत्रण अधिसुचना

**ज्याअर्थी, कोपरी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. ०९/०४/२०२४ रोजी **'गुढीपाडवा'** सणानिमित्त श्री कौपीनेश्वर सांस्कृतिक न्यास, नववर्ष स्वागतयात्रा २०२४ आयोजित करण्यात आलेले आहे. यात्रेनिमित्त भाविकांची गर्दी होणार असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी मी, डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) हरिनिवास सर्कल कडून ठाणे स्टेशन कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या हलक्या वाहनांना (दुचाकी, तीन चाकी, कार) **नौपाडा ब्रिज चढणीजवळील स्लीप रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने संत तुकाराम ब्रिजवरून भास्कर कॉलनी कट/बी कॅबीन, ब्राम्हण सोसायटी मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) तीन हात नाका कडून समर्थ भंडारकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या हलक्या वाहनांना (दुचाकी, तीन चाकी, कार) **टेलिफोन नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने टेलिफोन नाका कडून उजवीकडे वळण घेवून इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) तीन हात नाका व हरिनिवास सर्कल कडून ठाणे स्टेशन कडे जाणाऱ्या सर्व टी.एम.टी., ठाणे परिवहन सेवेच्या बसेसना सदर मार्गावर **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सर्व टी.एम.टी., ठाणे परिवहन सेवेच्या बसेस नितिन कंपनी मार्गे अल्मेडा चौक कडून खोपट मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**नो पार्किंग –** टेलिफोन नाका ते समर्थ भंडार रस्त्याचे डाव्या बाजूस कोणत्याही प्रकारची वाहने पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे.

सदर वाहतूक अधिसूचना दि. ०९/०४/२०२४ रोजी सकाळी ०८:०० ते ११:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५/वि.शा. ठाणे

<u>**प्रत कार्यवाहीसाठी**</u> :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे/नवी मुंबई/बृन्मुंबई/मिरा भाईदर महानगरपालिका.
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

<u>**प्रत**</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

<u>**प्रत**</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>**प्रत**</u> :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग ठाणे.